HSIL

**PRESS MONITOR**

Publication : Saanjwarta
Edition : Pune
Date : March 07, 2018

# मूनबोतर्फे अल्फीअस यूव्ही + यूएफ वॉटर प्युरिफायर

पुणे : मूनबोने भारतातील सर्वात शक्तीशाली यूव्ही वॉटर प्युरिफायर्समधील अल्फीअस यूव्ही+यूएफ हा वॉटर प्युरिफायर लाँच करून आपल्या उत्पादन श्रेणीचा विस्तार केला आहे. ९,४९०/- रुपये किमतीच्या या वॉटर प्युरिफायरला टीयूव्ही या जगविख्यात जर्मन प्रमाणीकरण प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. ॲल्युमिनिअमपासून तयार करण्यात आलेला सामान्य वॉटर प्युरिफायर एक लिटर पाण्यातून एक कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढू शकतो, तर अल्फीअसमध्ये एक लिटर पाण्यातून १०० कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढण्याची क्षमता आहे. पाण्यामध्ये विरघळलेल्या एकूण घनपदार्थांची पातळी (टीडीएस पातळी)



कमी असलेल्या भौगोलिक प्रदेशांसाठी अल्फीअस यूव्ही + यूएफ विशेषत्वाने तयार करण्यात आला आहे. कारण, अशा भागांत आरओ शुद्धीकरणामुळे पेयजलातील अत्यावश्यक क्षार नष्ट होतात आणि ते पाणी अनारोग्यकारक होते.

आरओ आधारित वॉटर प्युरिफायर्स पाण्यातील जड धातू आणि अन्य अशुद्ध घटकांसह अत्यावश्यक क्षारही पाण्यातून वेगळे काढतात. त्यामुळे टीडीएस पातळी कमी असलेल्या पाण्याचा पुरवठा होणाऱ्या भागात क्षार संरक्षण (मिनरल फोर्टिफिकेशन) तंत्रज्ञान नसलेले आरओ वॉटर प्युरिफायर्स वापरले जातात, तेव्हा शुद्ध केलेल्या पाण्यातील क्षारांचे प्रमाण मानवी शरीराला आवश्यक प्रमाणाच्या तुलनेत कमी भरते. याउलट, यूव्ही वॉटर प्युरिफायर्समध्ये टीडीएस पातळी कमी असलेल्या पाण्यतील सर्व आवश्यक नैसर्गिक क्षार कायम राखत अशुद्ध घटक काढून टाकण्याची क्षमता असते.